दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक २३४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.१९ नोव्हेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### खासगीकरणाचा सपाटा लावणाऱ्या भाजपाने

## एस.टी.महामंडळाच्या सरकारीकरणासाठी पाठींबा देणे दुटप्पीपणाचे : ना.विजय वडेट्टीवार

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

**भाजपने देशातील काँग्रेसने उभारलेल्या अनेक प्रकल्पांचे खासगीकरण करण्याचा सपाटा सुरू केलेला असताना एस.टी.महामंडळाच्या सरकारीकरणासाठीच्या आंदोलनाला पाठिंबा देणे हे दुटप्पीपणाचे वागणे असल्याची जळजळीत टीका राज्याचे पुनर्वसनमंत्री तथा काँग्रेस पक्षाचे रायगड संपर्कमंत्री ना.विजय वडेट्टीवार यांनी केली. छत्रपतींचा,नरवीरांचा अन् महामानवांचा रायगड जिल्हा काँग्रेसमय करणार असल्याचा निर्धारही यावेळी ना.वडेट्टीवार यांनी व्यक्त केला.**



कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये काँग्रेस पक्षाच्या जाहिर मेळावा आणि आढावा बैठकीप्रसंगी ना.वडेट्टीवार यांच्यासमवेत रायगड प्रभारी चारूलता टोकस, श्रीरंग बरगे, प्रदेश सरचिटणीस नंदा म्हात्रे, रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत पाटील रायगड जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा श्रध्दा ठाकूर,महाड विधानसभा काँग्रेस नेते हनुमंत मो.जगताप, महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा महाड नगराध्यक्षा स्नेहल जगताप-कामत तसेच महाराष्ट्र विद्यार्थी काँग्रेस सरचिटणीस श्रीयश जगताप, रायगड जिल्हा सरचिटणीस धनंजय देशमुख, जिल्हा खजिनदार दिलीप भागवत, शहरअध्यक्ष अमोल भुवड, उपसभापती शैलेश सलागरे, जिल्हा महिला काँग्रेस सरचिटणीस शुभांगी चव्हाण, पोलादपूर तालुका महिला काँग्रेस अध्यक्षा सुवर्णा भुवड, युवक तालुका अध्यक्ष प्रवीण महाडीक, शहर अध्यक्ष सचिन दुदुस्कर, विभागीय अध्यक्ष उस्मान करबेलकर तसेच खरेदी विक्री संघ अध्यक्ष अनंत देशमुख, श्रीधर सकपाळ, अनिल येरूणकर, महाड तालुका अध्यक्ष राजू कोरपे आदी व्यासपिठावर उपस्थित होते.

आपल्या घणाघाती भाषणामध्ये ना.विजय वडेट्टीवार यांनी, सत्तर वर्षांत काँग्रेसने काय केले असे विचारणारे आता महागाई, धार्मिक तेढ, नफेखोरी आणि बेरोजगारीने त्रस्त झाले आहेत. हीच योग्य वेळ आहे काँग्रेसने काय केले सांगण्याची आणि केंद्रातील सरकार काय करीत आहे हे समजवून सांगण्याची. मोजक्याच कार्यकर्त्यांच्या माध्यमातून रोज एक तास घराघरात जाऊन संपर्क साधला तर संपूर्ण मतदार संघातील तब्बल २० पोलींग बूथपर्यंत अल्पावधीमध्येच काँग्रेसचे विचार पोहोचविता येतात. आता मोबाईलवरील सोशल मिडीयावरून मोदींची स्तुती करणाऱ्यांवर शिव्याशाप पडू लागले आहेत. कंगना राणावतसारख्या महिलेने स्वातंत्र्य भीकेमध्ये मिळालेले म्हणणे हा शहिदांचा अपमान आहे, प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये कंगना राणावतविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची गरज आहे, अशी खरमरीत टीका करून काँग्रेसच्या ब्रिटीशांविरूध्दच्या लढाईच्या परंपरेत हौतात्म्य आहे आणि हे ज्यांचे फोटो लावतात ते माफी मागत होते, असेही ना. वडेट्टीवार यांनी सांगितले. काँग्रेस कार्यकर्ता अन्य पक्षांच्या चटईवर बसणार नाही म्हणून तो एकला चलो रे चा नारा देऊन स्वतंत्रपण जोपासेल, असे मत यावेळी ना.वडेट्टीवार यांनी व्यक्त केले.

यावेळी रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांनी, रायगड जिल्ह्यातील काँग्रेस नेतृत्वामध्ये एकदिलाने काम करण्याची वृत्ती असताना अलिबाग पेणपासून महाड-पोलादपूरपर्यंत काँग्रेस पक्षसंघटना वाढविणार असल्याचे सांगितले.

### महाड येथे एनडीआरएफ बेस कॅम्पसाठी

## महसूल व वन विभागास कायमस्वरूपी जागा देण्यास शासनाची मान्यता : पालकमंत्री

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचे वाढते प्रमाण पाहता महाड येथे एनडीआरएफचे बचावपथक कायमस्वरुपी असावे, अशी मागणी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी केली होती.

त्यानुसार जिल्ह्यातील महाड येथे एनडीआरएफ बेसकॅम्पसाठी आवश्यक असलेली शासकीय जागा दुग्धव्यवसाय विभागाने देण्याबाबत सहमती दिली होती.



शासकीय दूध योजना महाड येथील २.५७.४६ हेक्टर आर.इतके क्षेत्र राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांना कायमस्वरुपी बेस कॅम्प तयार करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यामागचा उदात्त सामाजिक हेतू विचारात घेवून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांना ही जागा महसूल व वन विभागाकडे कायमस्वरुपी देण्यास कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या दि.१८ नोव्हेंबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यासह कोकणातील रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांनादेखील आपत्ती काळात तातडीच्या बचाव व मदतकार्यास महाड येथे होणाऱ्या या बेसकॅम्पमुळे उपयोग होणार आहे. वातावरणीय बदल, चक्रीवादळे होणे, दरड कोसळणे, अतिवृष्टीमुळे होणारी पूरपरिस्थिती, भू-सख्खलन आदी परिस्थितीत दुर्देवी घटनांमध्ये जीवितहानी टाळण्यासाठी हे एनडीआरएफ पथक लाभदायी ठरेल, असा विश्वास पालकमंत्री कु.तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

## हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेज येथे स्मृतीदिन साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेज तळोजा येथे वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

यावेळी कमळगौरी हिरू पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बबनदादा पाटील, शिवसेना तालुका संघटक रामदास पाटील, युवासेना तळोजा अधिकारी तेजेश पाटील, लॉ कॉलेज चे प्राचार्य डॉ.साखरे सर, फार्मसी कॉलेज चे प्राचार्य हांडे सर, इलाईट पब्लिक स्कुल च्या प्राचार्या सारिका मॅडम, काकेकर सर,पाटोळे सरआणि इतर सर्व प्राध्यापक व शिक्षक वृंद आणि कर्मचारी तसेच विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.



### संक्षिप्त...

## आ.गोपीचंद पडळकर यांना अटक होणार?

**सांगली : वृत्तसंस्था**

सांगली जिल्हा बँकेच्या निवडणूक वादातून गेल्या आठवड्यात आटपाडी येथे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाला होता. त्या घटनेत राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते राजू जानकर यांच्या अंगावर गाडी घालून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा गोपीचंद पडळकर आणि जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तानाजी पाटील यांच्यावर दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळावा, यासाठी आमदार पडळकर आणि तानाजी पाटील यांनी न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, आज झालेल्या सुनावणीत जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. व्ही. जगताप यांनी आमदार पडळकर आणि पाटील यांचा जामीन अर्ज फेटाळला.

सांगली जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मतदारांची पळवा-पळवी करण्याच्या वादातून आमदार गोपीचंद पडळकर यांनी दमदाटी आणि मारहाण केल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते राजू जानकर यांनी केला होता. त्या वादातून आमदार पडळकरांनी गाडी अंगावर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची फिर्याद जानकर यांनी आटपाडी पोलीस ठाण्यात दिली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना कार्यकर्त्यांनी गाडीवर दगडफेक केल्याची फिर्याद आमदार पडळकर यांनी दाखल केली आहे. त्याबाबत आटपाडी पोलीस ठाण्यात परस्परविरोधी फिर्यादी दाखल झाल्या आहेत. त्यातून पोलिसांनी दोन्ही गटाच्या दहा जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. या गुन्ह्यात अटक पूर्व जामीन मिळावा, यासाठी आमदार पडळकर आणि तानाजी पाटील यांनी न्यायालयात धाव घेतली आहे.

## मोबाईलसह घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारांना पनवेल शहर पोलिसांनी केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात मोबाईलसह घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून गुन्ह्यातील सहा मोबाईल हस्तगत केले आहेत.

शहरातील एस.टी.स्टॅण्ड मागील लोकमान्य नगर येथे अमेय सुर्वे यांचे एव्हीएस नावाचे मोबाईल सर्व्हीस सेंटरचे दुकान असून सदर दुकानाचे शटर उचकटून डोअर लॉक तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करून दुरुस्तीसाठी आलेले ग्राहकांचे एकूण १३ मोबाईल ज्याची किंमत जवळपास ६७ हजार रुपये इतकी होती ते अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची तक्रार त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार पोलीस उपायुक्त परिमंडळ २ चे शिवराज पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि गणेश दळवी, पोलीस उपनिरीक्षक फरताडे, पो.हवा. गंथडे, रवींद्र राऊत, पो.ना.महेश पाटील, पो.ना.अशोक राठोड, गुन्हेगारांचे कर्दनकाळ पो.ना.भगवान साळुंके, पो.शि.राजू खेडकर, विवेक पारासूर आदींच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज, गुप्तबातमीदार आदींच्याद्वारे या चोरट्यांची माहिती घेत असताना या गुन्ह्यातील एक आरोपी सौरभ भगवानदास बदोनिया याला सुभाषनगर मुंबई येथून ताब्यात घेतले असता त्याचा या गुन्ह्याच्या तपासात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास अटक केली आहे. व त्याच्याकडून या गुन्ह्यातील ६ मोबाईल ज्याची किंमत ३९ हजार रुपये इतकी आहे हे हस्तगत करण्यात आले आहेत. या गुन्ह्यात इतरही आरोपींचा सहभाग असल्याने त्यांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

## खालापूरात आत्करगाव येथील एसएमएस कंपनीला विरोध ; ग्रामस्थांचा आक्रमक पवित्रा



**दै.रायगड नगरी । खोपोली**

जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावणारा प्रदूषणकारी एसएमएस कारखाना मुंबईतून खालापुरात आत्करगाव येथे येणार आहे.मानवी स्वास्थ्याला घातक असणारा कारखाना साजगांव पंचक्रोशीत नकोच या मागणीसाठी सुरुवातीपासूनच ग्रामस्थ विरोध करतायेत आणि शेवटच्या श्वासापर्यंत विरोध करू असा आक्रमक पवित्रा स्थानिक ग्रामस्थांनी घेतला असून याबाबत ग्रामस्थांची बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी सॅम्युअल मॉल येथे झालेल्या जनसुनावणीच्या दरम्यान नागरिकांनी घोषणाबाजी करून निषेध करीत आमचा नागरिकांनी सुरुवातीलाच कामकाजाला विरोध दर्शविल्याने जवळपास तासभर घोषणाबाजी करीत कामकाज थाबविले आणि त्यानंतर नागरिकांच्या प्रतिनिधींना नागरिकांच्या वतीने म्हणणं मांडण्याची संधी दिली यात सदरचा कारखाना हा नागरिकांच्या आरोग्याला धोका पोहचविणरा आहे त्यामुळे या कारखान्याला परवानगी देऊ नये अशी मागणी करीत सभागृहात गदारोळ निर्माण झाला होता यावेळी लोकप्रतिनिधी प्रभावी पणे बाजू मांडून कडकडून विरोध दर्शविला.

एसएमएस कारखान्याच्या जागेपासून २०० मी अंतरावर गाव नदी तसेच ५०० मी अंतरावर पाझर तलाव, आत्करगांव, आडोशी, चिंचवली, टेंबेवाडी, होनाड, कुंभेवाडी,आत्करगांव वाडी, बौध्दवाडा,जंगमवाडी जैविक प्रकल्प उभारल्यास कुजलेल्या कचऱ्यामुळे हवा दुषित होवून दुर्गधी पसरले,तसेच जंतू पाण्यात मिसळल्यास नदी तलाव दुषित होवून नदीवरील पाणी योजना दुषित हो साथीचे आजारांमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होवू शकतो.त्यामुळे ग्रामस्थांनी विरोध दर्शविताच दि.१३ ऑगस्ट रोजीची जनसुनाणी रद्द करण्यात आली आणि नागरिकांनी जल्लोष साजरा केला परंतु पुन्हा जनसुनावणी जाहिर झाल्यानंतर स्थानिक ग्रामस्थांनी खा.सुनिल तटकरे, आम.जयंत पाटील यांच्या समक्ष भेट घेवून सदर घटनाक्रम सांगितल्यावर जिल्हाधिकारी, स्थानिक आमदार महेंद्र थोरवे, मा.आम सुरेश लाड जिल्हा परिषद सदस्य नरेश पाटील यांनीही निवेदन दिले आहे. या कारखान्याच्या बाबत नागरिकांचे म्हणणे ऐकुन घेण्यासाठी जनसुनावणी .../२

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा भूसंपादनाचा विरुद्ध अजब फतवा

## माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचा माणगांव प्रांत कार्यालयावर मोर्चा

**दै.रायगड नगरी । माणगाव**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे भूसंपादन माणगाव व रोहा तालुक्यात चालू आहे. साधारण २०१४ पासुन येथील टप्पा क्रमांक १ च्या भूसंपादनाचे काम चालू आहे. ७००० ते ८००० एकर चे संपादन शेतकऱ्यानी संमती पत्र देऊन कोणताही अडथळा न आणता करून दिले. तसेच वरील सर्व शेत जमिनीच्या ७/१२ वर एमआयडीसीने भूसंपादनाचे शिक्के २०१२ ते २०१४ दरम्यान मारले होते. त्या मुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनी त्यांच्या अडीअडचणी प्रसंगी विकता आल्या नाहीत. तसेच एवढे मोठे भूसंपादन करताना ७/१२ तील तफावत, जमिन मोजणी, भाऊ बंधकी, वारसपंचनामे, बहिणीचा



हिस्सा, वैयक्तिक कर्ज, कोर्टकचेरी प्रकरणे मिटवून आम्ही सर्वांनी संमती पत्र दिले. तसेच प्रशासनाच्या चुकांमुळे अथवा रेकॉर्ड मधील फरकांमुळे माणगाव येथिल भूसंपादन अधिकाऱ्यांनी चूक दुरुस्ती चे प्रस्ताव सुमारे ७/८ महिन्यांपूर्वी एमआयडीसी विभागात पाठवले आहेत त्याचे अजून कोणतेही उत्तर आले नाही.

या करीता माणगांव तालुक्यातील इंदापुर व निजामपुर या विभागातील शेतकऱ्यांनी .../२

## आदिती तटकरे यांच्या हस्ते माणगांव उपजिल्हा रुग्णालयात डायलिसीस सेंटरचे लोकार्पण

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

उपजिल्हा रुग्णालय माणगांव येथे महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते दि. १८ नोव्हेंबर रोजी डायलेसीस सेंटरचा लोकार्पण सोहळा पार पडला.



यावेळी माणगांव प्रांताधिकारी प्रशाली दिघावकर, तहसीलदार प्रियांका आयरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रदिप इंगोले, सभापती अलका जाधव, पो. नि. अश्वनाथ खेडकर, मा. ता. रा. काँ. अध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, पं. स. सदस्य शैलेश भोनकर, डॉ. दिपक देशमुख, माजी नगरसेवक रत्नाकर उभारे, दिलीप जाधव, रवींद्र मोरे, मुहम्मद धुंदवारे, रुपेश तोडकर, विद्युत पर्यवेक्षक संजय गांधी, डॉ. सुनिता कोकणे, मयूर शेठ, रा. काँ. पदाधिकारी, रुग्णालय कर्मचारी आदी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालयामध्ये प्रथमच उप जिल्हा रुग्णालय माणगांव येथे डायलेसीस सेंटर .../२

# कोविड १९ लसीकरणासाठी प्रोत्साहन देण्यासाठी मुरुड नगरपरिषदेतर्फे लकी ड्रॉ चे आयोजन

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड जंजिरा शहरात नगरपरिषद हद्दीमध्ये सुमारे १२,५०० लोकसंख्या असून कोविड १९ प्रतिबंधक लसीकरणाचे काम साधारण ८५ टक्के पर्यंत पूर्ण झाले आहे. १८ वर्षावरील नागरिकांचे लसीकरण १०० टक्के पूर्ण व्हावे या हेतूने शहरात राहणाऱ्या नागरिकांना कोविड १९ लसीकरणासाठी प्रोत्साहन देण्यासाठी दि. १८ /११/२०२१ ते दि. ३०/११/२०२१ पर्यंत कोविड १९ लसीकरणाचा पहिला व दुसरा डोस घेणाऱ्या नागरिकांना नगरपरिषदेमार्फत लकी ड्रॉ द्वारे २० भाग्यवान नागरिकांना कुकर, मिक्सर, घड्याळे, फॅन, इस्त्री, बॅग, म्युझिक सिस्टीम सारखे भेटवस्तू देण्यात येणार असल्याचे नगराध्यक्षा यांनी सांगितले.

## परिक्षेत्र वन अधिकारी, अलिबाग यांचे कार्यालय-अलिबाग

महाराष्ट्र शासन

मु.बामणोली(खडताळ पुल) पो.थळ ता. अलिबाग, जि. रायगड पिन 402 207

Email :-rfoalibag@mahaforest.gov.in दुरध्वनी क्र. 02141-222997

### जाहिर निविदा सुचना

मा. उपसंचालक, अलिबाग वनपरिक्षेत्रातील Boundary pillar, Construction of Gabian Bandhara, व Amenities for Woman Front line Staff चे कामे करण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनीक बांधकाम विभाग, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, महाराष्ट्र जिवन प्राधीकरण, जिल्हा परिषद व जल संपदा विभाग या विभागाकडे वर्ग १ ते ७ वर्गातील पंजीकृत कंत्राटदाराकडून खालील नमुद अटी-शर्तीचे अधिन राहून दिलेल्या प्रपत्रात सिलबंद लिफाफ्यामध्ये निवीदा मागविण्यात येत आहे. संबंधीत कामाबाबतचे निवीदा फॉर्म व अटी-शर्ती प्रती काम निहाय रू १००/- रोखीने भरणा केल्यास दुपारी १२ ते ०३ वाजेपर्यंत वनपरिक्षेत्र अधिकारी अलिबाग (संरक्षण) येथे उपलब्ध होईल.

| | |
|---|---|
| निवीदा प्रकाशित करावयाची तारीख | १८/११/२०२१ |
| निवीदा फॉर्म व अटी-शर्ती मिळण्याची तारीख व वेळ | १८/११/२०२१ ते २४/११/२०२१<br>दुपारी १२.०० ते ०३.०० वाजेपर्यंत |
| निवीदा भरण्याची अंतिम तारीख | २४/११/२०२१<br>दुपारी १२.०० ते ०३.०० वाजेपर्यंत |
| निवीदा उघडण्याची तारीख | दिनांक १/१२/२०२१ (सोईनुसार) |

**कामाचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | कामाचे विवरण | कामाची संख्या | काम करण्याची कालमर्यादा | अंदाजपत्रकीय रक्कम लाखामध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | Boundary Pillar Class I- Bherse Sec. 4 RF Gat No. 447, Boundary Pillar Class II- Bherse Sec. 4 Gat No. 447 | ०२ | ०१ महिना | ०.५३ |
| २ | Boundary Pillar Class I- Lonare Sec. 4 Gat No.13/1/1, Boundary Pillar Class II- Lonare Sec. 4 Gat No. 13/1/1 | ०२ | ०१ महिना | ४.८३ |
| ३ | Boundary Pillar Class I- Thale Sec. 4 Gat No. 128, Boundary Pillar Class II- Thal Sec. 4 Gat No. 128 | ०२ | ०१ महिना | २.४२ |
| ४ | Construction of Gabian Bandhara- Saral C.N. 155 | ०१ | ०१ महिना | १.८१ |
| ५ | Construction of Gabian Bandhara- Karla C.N. 160 | ०१ | ०१ महिना | १.८३ |
| ६ | Construction of Gabian Bandhara- Gerasagargad C.N.164 Part | ०१ | ०१ महिना | १.८१ |
| ७ | Construction of Gabian Bandhara- Tinvira C.N.163 Part | ०१ | ०१ महिना | २.१५ |
| ८ | Amenities For Woman Front line Staff- Alibag RF S.N. 84 | ०१ | ०१ महिना | ५.०० |

तरी इच्छुक कंत्राटदार यांनी निवीदा कालावधीत वनपरिक्षेत्र कार्यालय अलिबाग (संरक्षण) येथे निवीदा सादर कराव्यात. अधिक माहितीसाठी वनपरिक्षेत्र अधिकारी अलिबाग (संरक्षण) यांच्या कार्यालयाशी सुट्टीच्या दिवसाखेरीज कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- १५/११/२०२१

(वि. श्री. तरसे)
वनपरिक्षेत्र अधिकारी (संरक्षण)
अलिबाग

क्र.जिमाका/राअ/जाहि/१४४/२०२१-२२

# तळा नगरपंचायत निवडणुक भाजपा स्वबळावर लढणार : अॅड.निलेश रातवाडकर

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायतीची आरक्षण सोडत सोमवारी जाहीर होताच सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. भारतीय जनता पक्षाने देखील मोर्चे बांधणीला सुरुवात केली असून नगरपंचायतीच्या सर्वच्या सर्व १७ जागा भाजप स्वबळावर लढणार असल्याचे तालुका अध्यक्ष अॅड. निलेश रातवडकर यांनी जाहीर केले. भाजप शहर पदाधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. नगरपंचायत निवडणुकीत सर्वच्या सर्व जागा स्वबळावर लढवण्याचा ठराव मांडण्यात आला या ठरावास सर्वानुमते अनुमोदन देण्यात आले. येणाऱ्या निवडणुकीत भाजप कुठेही कमी पडणार नाही असा विश्वास कार्यकर्त्यांना त्यांनी या वेळेस दिला. तळा शहराचा विकास हा भाजपच्या माध्यमातूनच होणार असा ठाम विश्वास त्यांनी या वेळेस दिला.

काही योजना अशा आहेत कि त्या सामान्य जनतेपर्यंत पोहचत नाही त्या सर्व योजना घराघरात नेऊन त्यांचा नागरिकांना लाभ करून द्या असं माजी तालुका अध्यक्ष कैलास पायगुडे यांनी यावेळेस बोलताना कार्यकर्त्यांना सांगितले. या कार्यक्रमात तळे शहरात खूप विकासाची कामे अपूर्ण आहेत, तालुक्यातील बाजारपेठ मंदावली आहे. हि बाजारपेठ पुन्हा कशी फुलेल आणि स्थानिकांना कसा रोजगार निर्माण होईल या सर्व गोष्टींचा विचार करून पक्षामार्फत सर्व प्रश्न मार्गी लावण्याचं काम मी हाती घेतलं आहे, त्या संदर्भात वरिष्ठांशी बोलणं सुरू झालं असून लवकरच हे काम मार्गी लावण्याचा मी प्रयत्न करणार असल्याचे अॅड. निलेश रातवडकर यांनी सांगितले.

सोमवारी नव्याने आरक्षण जाहीर झाल्यानंतर भाजप सोडलं तर अद्याप कोणत्याही पक्षाने आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेस महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढवतील याबाबत अद्याप कोणत्याही पक्षाकडून भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये देखील संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र भाजपने ऐकला चलो चा नारा देत स्वबळावर लढणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच निवडणूक निकालानंतर नगरपंचायतीमध्ये भाजपचाच नगराध्यक्ष विराजमान होईल असा विश्वास देखील व्यक्त केला.यामुळे पूर्वापार शिवसेना व राष्ट्रवादी अशा होत असलेल्या दुरंगी लढतीत आता भाजपने देखील आपले आव्हान उभे केले आहे. तळा शहरातील नागरिकांना आता नगरपंचायत निवडणुकीत तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे. या सभेमध्ये भाजपा तालुका अध्यक्ष अॅड.निलेश रातवाडकर, माजी अध्यक्ष कैलास पायगुडे, शहर अध्यक्ष सुधीर तळकर, विलास ठसाळ, प्रशांत सकपाळ, संदीप कदम, सुयोग बारटक्के, रितेश मुंढे आदी मान्यवर उपस्थित होते.

अर्जदारांचे वकील : अॅड.राकेश केणी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.३४/२०२१
ने.ता.२१/१२/२०२१

श्रीमती.इंदुबाई देवीदास कातकरी — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत भिंगार
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाचा मृत्यू दि.२४/०८/२०२१ रोजी रा.भेरले, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार यांनी आपला मुलगा कै.जगदीश देवीदास कातकरी, यांच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.जगदीश देवीदास कातकरी वर नमूद ठिकाणी मृत्यू झालेले आहेत किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाची हरकत असेल, तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत त्याांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या कायदेशीर हरकती नोंदविण्याचे आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येत आहे की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून, त्यांस सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.१८ माहे ११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्याया.वाशी — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्याया.वाशी

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मी/आम्ही खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे जमीन मालक श्री.मदन कान्हा म्हात्रे खाली नमूद जमीन मिळकत विक्री करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमीन मिळकतींचे वर्णन**
**मौजे : चिपळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | पो.ख. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | ९/३ | ०-१५-० | ०-००-० | २.४४ |
| एकूण क्षेत्र ०-१५-० हे.आर.पॉ. (१५ गुंठे) | | | | |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे, दरखास्त, मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आम्ही सदर व्यवहार पूर्ण करू, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचेवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल
दिनांक : १९/११/२०२१

**सही/-**
**अॅड.किशोर एम.केंडे**
**श्रावण को.ऑप.हौ.सो., माथेरान रोड, सेक्टर १२, नवीन पनवेल-४१०२०६**
**मो.नं.९२२६६५०२०१**

मा.पांडे साहेब यांचे कोर्टात
अर्जदारातर्फे वकील
अॅड.संदीप जगे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.११७४/२०२१
ने.ता.२०/१२/२०२१

सौ.सुरेखा रमेश दुर्गे
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.गणपती मंदिराजवळ, मु.पालेखुर्द,
पो.देवीचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
निबंधक जन्म व मृत्यू नोंदणी
ग्रुप ग्रामपंचायत शिरवली
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार हिची आई देवकुबाई भाऊ ठोंबरे या दि.१०/०८/१९८२ रोजी मौजे : चिंचवली, ता.पनवेल, जि.रायगड येथे मरण पावल्या आहेत. परंतु मयत देवकूबाई भाऊ ठोंबरे यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हिचे घरातील व्यक्तींकडून अज्ञानामुळे / अनवधानाने एक वर्षाच्या आत शासन दप्तरी त्याचे मृत्यूची नोंद करण्याचे राहून गेले आहे. सबब अर्जदार हिने सदरील अर्ज मयत देवकूबाई भाऊ ठोंबरे यांच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश होण्याकरिता या मे.कोर्टात दाखल केलेला आहे. सदर अर्जदार हिस तिचे मागणीप्रमाणे कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदार हिस तिचे विनंतीप्रमाणे मे.कोर्ट योग्य ते आदेश करतील याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१८ माहे ११ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक प्रथमवर्ग न्याय.पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक प्रथमवर्ग न्याय.पनवेल

मा.इंदलकर सो.यांचे कोर्ट
अॅड.ज्ञानेश्वर श्री.कुळकर्णी
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज नं.१०६९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२१/१२/२०२१

श्री.मंगेश रमेशचंद शुक्ला — अर्जदार
विरुद्ध
मा.मुख्याधिकारी तथा निबंधक सो.
जन्म, मृत्यू नोंदणी, पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कु.प्रिन्स मंगेश शुक्ला हे अर्जदार यांचे नात्याने मुलगा असून, कु.प्रिन्स मंगेश शुक्ला याचा जन्म दि.३०/०६/२०१५ रोजी सत्यम मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल अॅण्ड ट्रॉमा केअर सेंटर कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झालेले आहेत. त्याअर्थी अर्जदार श्री.मंगेश रमेशचंद शुक्ला यांनी जन्म-मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १० अन्वये कु.प्रिन्स मंगेश शुक्ला यांच्या जन्म नोंद करून मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

सदरकामी कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.न्यायालय वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची जन्म-मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १० अन्वये कु.प्रिन्स मंगेश शुक्ला यांच्या जन्माची उशिरा नोंद करून मिळणेबाबतचा दाखला केलेला अर्ज मंजूर करील.

आज दि.१८/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, वाशी — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, वाशी

अर्जदाराचे वकील : अॅड.सलमान रशीद पटेल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.११७८/२०२१
ने.ता.२३/१२/२०२१

सौ.जैबुनीसा इनामुल्ला शेख
वय : ३२, धंदा : घरकाम
रा.रा.मु.पो.चारठाणा, परभणी,
ता.जिंतूर, जि.परभणी — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका, विभाग तळोजा पाचनंद — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार यांचे पती इनामुल्ला गफूर शेख हे दि.१६/०४/२०२० रोजी मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मरण पावली आहे. सदरहू अर्जदार यांनी मयत इनामुल्ला गफूर शेख यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

सदरहू पै.इनामुल्ला गफूर शेख वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे सदरहू पै.इनामुल्ला गफुर शेख यांच्या मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१८/११/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.रोहित अनिल पाणसरे, रा.रुम नं.१०१, श्रीजी कृपा सोसायटी, प्लॉट नं.६२/१, पनवेल, जि.रायगड यांचे व त्यांचे वडील कै.अनिल सुंदर पाणसरे यांच्या एकत्रित मालकीचा रुम नं.१०१, श्रीजी कृपा सोसायटी, प्लॉट नं.६२/१, पनवेल, जि.रायगड या मिळकतीच्या दि.१५/११/२००२ रोजी दस्त क्रं.०२४०९/२००२ अन्वये नोंदणीकृत केलेल्या खरेदीखताची मुळ प्रत दि.०९/११/२०२१ रोजी पनवेल परिसरात हरवली / गहाळ झाली आहे.

आमचे अशिलांनी सर्व ठिकाणी शोध घेतला परंतु त्यांना सदरची मुळ प्रत कोठेही सापडली नाही / आढळून आली नाही. आमचे अशिलांनी सदरची मुळ प्रत हरवले / गहाळ झाालेबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस स्टेशनमध्ये दि.१७/११/२०२१ रोजी नोंदविली असून त्याचा क्र.०४५/२०२१ असा आहे. सदरची मुळ प्रत त्यांनी कोणाही व्यक्तीकडे, बँकेकडे अथवा संस्थेकडे तारण, गहाण ठेवलेली नाही.

सदरची मिळकत ही मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील असल्याने सदर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदरची मुळ प्रत कोणालाही सापडल्यास खालील पत्यावर गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, कुळ, वहिवाट, वापर वहिवाटीचा हक्क, इजमेंट, बोजा-चार्ज, अॅटॅचमेंट, मनाई आदेश, दंग-दावा, साठेकरार अगर अन्य कोणत्याही मार्गाने हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्तींनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत स्वतःचे मालक हितसंबंधाविषयी सकृतदर्शनी पुराव्यासह आमच्या खालील पत्यावर आपल्या लेखी हरकती स्वतः अगर प्रतिनिधीमार्फत सादर कराव्यात किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर सदनिका ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजले जाईल व त्यानंतर आलेल्या हरकती गृहीत धरल्या जाणार नाहीत. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी, हे सर्व जाहीर व्हावे.

**सही/-**
**सौ.अमृता अशोक नाईक**
**(अॅडव्होकेट व नोटरी)**

**पत्ता : शॉप नं.७, योगेश्वर कृपा को.ऑप.हौ.सो., ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६**
**फोन नं. : ९९७५५४७२५०/९९३०८८८४०८**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## माणगांव उपजिल्हा रुग्णालयात डायलिसीस सेंटरचे लोकार्पण

सुरू करण्यात आले आहे. माणगांव तालुक्यासह श्रीवर्धन, म्हसळा, तळा आजूबाजूच्या तालुक्यातील रूग्णांना याचा फायदा होणार असून आता डायलेसिससाठी मुंबई, पुणे जाण्याची आवश्यकता नाही. ऑनलाईन पद्धतीने रुग्णांना डायलेसीस सेंटरचा लाभ घेता येणार आहे. सुरुवातीला दररोज २ रुग्णांची तपासणी करण्यात येणार आहे. महात्मा ज्योतिबा फुले योजने अंतर्गत डायलेसीस सेवेचा लाभ मिळणार असल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रदिप इंगोले यांनी दिली. यावेळी ना. आदिती तटकरे यांनी सांगितले की, अत्यंत अल्प दरात डायलेसीस सुविधा उपजिल्हा रुग्णालय माणगांव येथे उपलब्ध करण्यात आली असून, रुग्णांना यामुळे पनवेल इतर शहरात जावे लागणार नाही. येत्या वर्षभरात अजून मशनरी उपजिल्हा रुग्णालय माणगांव येथे उपलब्ध करण्यात येतील. श्रीवर्धन, रोहा, पेण, कर्जत येथील येथील उपजिल्हा रुग्णालयात सुद्धा लवकरच डायलेसिस सेंटर करणार आहोत. गेल्या दीड दोन वर्षात आयसीयू बेड, ऑक्सिजन बेड, ऑक्सिजन प्लांट अशा अनेक प्रकारच्या सुविधा उपजिल्हा रुग्णालय माणगांव येथे उपलब्ध आहेत. दुर्दैवाने जर कोरोनाची तिसरी लाट आलीच तर त्यासाठी सक्षम यंत्रणा उभ्या केलेल्या आहेत.

## खालापूरात आत्करगाव येथील एसएमएस कंपनीला विरोध

घेण्यात आली यावेळी उपजिल्हा धिकारी श्रीमती पद्मश्री बैनाडे प्रदूषण मंडळ अधिकारी तहसीलदार आयुब तांबोळी यासह अन्य अधिकारी तसेच नागरिकांच्या वतीने भाई शिंदे, अंकित साखरे, एकनाथ पिंगळे, समीर देशमुख, संदीप पाटील राम देशमुख काशीनाथ पाटील चंद्रकात देशमुख किशोर पानसरे सुनील पाटील नरेश गायगवाड सुनील सुखदरे, मनीष खवळे आदिनी प्रभावी पणे बाजू मांडून होऊ पाहणाऱ्या कंपनीला विरोध दर्शविला यावेळी उप जिल्हाधिकारी श्रीमती बैनाडे यांनी आपण आपली बाजू माडावी अशी सूचना करून सदरचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात येईल अशी सूचना केली. पालकमंत्री आदिती तटकरे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, जिल्हा परिषद सदस्य नरेश पाटील यांनी या कारखान्याला विरोध दर्शवून लेखीपत्र दिले आहेत सदरची सुनावणी सुरू असताना जिल्हा परिषदेची मिटिंग सुरु असून या खालापुरात आत्करगाव येथील एसएमएस कंपनीला विरोध असल्याचा ठराव झाला असून कोणत्याही प्रकारे परवानगी चे पत्र या पुढे देणार नसल्याचा ठराव झाल्याची माहिती जिल्हा परिषद सदस्य नरेश पाटील यांनी दूरध्वनी व्दारे कळविले आहे त्यामुळे नागरिकांनी या ठारावाचे स्वागत केले.

## माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचा माणगांव प्रांत कार्यालयावर मोर्चा

दि.१८ नोव्हेंबर रोजी माणगांव येथील उपविभागीय अधिकारी प्रशाली जाधव- दिघावकर यांना निवेदन देण्यात आले. या निवेदना मध्ये शेतकऱ्यांनी माणगांव प्रांताधिकारी यांच्याजवळ बोलताना सांगितले की, आमच्या जमिनीचा मोबदला लवकच द्या नाहीतर ७/१२ वरील शिक्के हटवा अशी मागणी केली. यावेळी प्रांतअधिकारी यानी शेतकऱ्यांना आश्वासन दिले की शासनाने शेतकऱ्यांना मोबदला देण्याचा निर्णय जाहीर केला तर आम्ही आमच्या कार्यालया कडून भुसंपादित शेतकऱ्यांना मोबदला देऊ यावेळी शेतकरी राजेश कदम, नितिन शिर्के, मंगेश वालुगडे, संजय वालुगडे, लहु लुस्टे, सदिप कदम, गोपाळ कदम, सुरज पवार, संतोष रसाळ, अविनाश जाधव, प्रभाकर कदम, शांताराम कजबजे, आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांची मनमानी कारभाराची हद्दच झाली आहे. आम्ही साधारण ६ महिन्या पूर्वी संमतीपत्र दिले असुन सुद्धा आम्हाला भूसंपदानाचा मोबदला मिळाला नाही. तसेच आमच्या गावातील इतर साधारण ६०% शेतकरी बांधवाना यापूर्वीच मोबदला मिळाला आहे. परंतु आता भूसंपादनाचा मोबदला एमआयडीसी च्या मनमानी कारभारामुळे आम्हाला मिळाला नाही. आज पर्यंत भूसंपादन अधिकारी भुवन,जामगाव, पाथरशेत, रातवड, घोटवळ, नीळज, पाणसई, कालवण, दाखणे, भाले, वावेदिवाळी, कुंभार्ते, बोडशेत कांदळगाव, जावटे, कोशिबळे तर्फे निजामपूर या गावातील शेतकऱ्यांना भूसंपादन अधिकारी त्यांच्या संमतीपत्रानुसार मोबदला देत होते. व आज वरील गावातील उरलेल्या संमती पत्र दिलेल्या शेतकऱ्यांनी भूसंपादन कार्यालयात चौकशी केली असता आता फक्त कुंभार्ते, बोंडशेत कांदळगाव, जावटे,कोशिबळे तर्फे निजामपूर या गावातील शेतकऱ्यांनाच भूसंपादन मोबदला मिळेल व बाकिच्या उरलेल्या गावातील संमती पत्र दिलेल्या शेतकऱ्यांना एमआयडीसी चे पत्र व एमआयडीसीकडुन मोबदल्याची रक्कम आल्या वरच मिळेल असे शासना कडून कळले, असा मनमानी कारभार एमआयडीसीचे अधिकारी कसा करू शकतात? आम्हाला आमच्या जमिनीचा संमतीपत्र देउन सुद्धा जर वरील सहा गावाना सोबत मोबदला मिळाला नाही तर आम्ही माणगांव प्रांत कार्यालयासमोर उपोषण सुरू करणार असून वेळ पडल्यास आत्मदहन देखील करू परंतु त्या सहागावातील कोणत्याही शेतकऱ्यास मोबदला घेउन देणार नाही. तसेच रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे या भागातील असताना देखील मनमानी कारभार एमआयडीसी तील वरिष्ठ अधिकारी कसा करू शकतात असा प्रश्न देखील शेतकरी बांधवाना पडला आहे. तरी एमआयडीसी व त्यांच्या भूसंपादन अधिका-यांनी आम्ही दिलेल्या सर्व संमतीपत्रा नुसार ताबडतोब भूसंपदानाचा मोबदला द्यावा. नाहीतर उग्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी शासनाला दिला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सिद्धेश्वर ग्रामपंचायतीच्या प्लास्टिक मुक्त गाव व सोलर नळ पंप योजनेचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर ग्रामपंचायतच्या प्लास्टिक मुक्त गाव व सोलर नळ पंप योजनांचे पालकमंत्री अदिती तटकरे, आमदार रवींद्र पाटील व मान्यवरांच्या हस्ते नुकतेच उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी सिद्धेश्वर ग्रामपंचायतीने आता पर्यंत विविध उपक्रम व नव्याने चालू केलेल्या प्लास्टिक मुक्त ग्रामपंचायत अभियानची माहिती घेतली आणि कौतुक केले. स्वदेस फाऊंडेशन, प्राइड इंडिया व इतर स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून व लोकसहभागतून झालेल्या कामांचे कौतुक केले. तसेच सिद्धेश्वर नळपाणी पुरवठा योजना आणि स्वदेश माध्यमातून बसवण्यात आलेल्या सोलर ग्रामपंचायतने बसवलेल्या नेट मीटर तसेच प्लास्टिक मुक्त ग्रामपंचायत अभियान उपक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास पालकमंत्री अदिती तटकरे, आमदार रवींद्र पाटील, जि. प. सदस्य सुरेश खैरे, राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हा अध्यक्षा गीता पालरेचा, सुधागड पंचायत समिती सभापती रमेश सुतार, सरपंच उमेश यादव, भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, माजी सभापती साक्षी दिघे, शिवसेना माजी रायगड जिल्हा उपप्रमुख राजेंद्र राऊत, रायगड जिल्हा काँग्रेस सरचिटणीस प्रमोद राईलकर, उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, तहसिलदार दिलीप रायण्णावार, गटविकास अधिकारी विजय यादव, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्मिता बिरकर, प्राइडचे मोरे, स्वदेसचे विकास करमाळे, सुकन्या ग्राम संघ अध्यक्ष प्राजक्ता यादव, सचिव मनाली जांभूळकर, उमेद तालुका प्रमुख श्री पाटील, अनुराधा गायकवाड बचत गट महिला आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत उपसरपंच योगेश सुरावकर, सदस्य नथुराम चोरघे, संजना फाळे, विद्या यादव, तुकाराम पवार, रंजना जाधव, ग्रामसेवक ए. टी. गोरड, गणेश महाले, सचिन मुंढे, संध्या यादव शिक्षक रमाकांत शिंदे ,पोलिस पाटील सुधीर महाले, विजय महाले, श्रीपत पवार, रवी यादव, रोशना महाले यांनी प्रयत्न केले.



# एसटीचा संप विद्यार्थ्यांच्या मुळावर; विद्यार्थ्यांच्या डोक्यावर मृत्यूची टांगती तलवार

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सलग दीड वर्षातून अधिक काळ कोव्हिडं महामारीत शाळा , महाविद्यालय बंद होती, कोव्हिडं १९ चा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर ऑक्टोबर महिन्यापासून इयत्ता ५ वी पासून पुढील इयत्तांच्या शाळा नियमित सुरू झाल्या खऱ्या मात्र एसटी संपाने विद्यार्थ्यांच्या अध्यनाला ब्रेक लागला आहे. सर्वसामान्य गोरगरीब जनतेसाठी एसटी मुख्य जीवन वाहिनी मानली जाते, मात्र एसटी चा संप असल्याने नागरिक व विद्यार्थ्यांना अनेक समस्या व अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गलगत असणाऱ्या शाळा व महाविद्यालयात जाण्यासाठी व येण्यासाठी एसटी बसचा प्रवास विद्यार्थ्यांना सोयीचा पडतो, मात्र आता एसटी बंद असल्याने खाजगी वाहनाचे वाढीव भाडे विद्यार्थ्यांना परवडत नाही, परिणामी रखरखत्या उन्हात विद्यार्थी कोसो दूर पायी चालत येजा करीत आहेत, यामध्ये विद्यार्थ्यांचा श्रम, वेळ



व पैसे वाया जातात, तर अध्ययनाला देखील ब्रेक लागताना दिसतोय. शिवाय महामार्गावरील वेगवान व अवजड वाहनांची ठोकर बसून अपघात होण्याचा धोका देखील वाढला आहे. त्यामुळे लवकरात लवकर एसटी बस सेवा सुरू करावी अशी मागणी विद्यार्थी पालक व शिक्षक वर्गातून जोर धरत आहे.


जिल्ह्यातील दूर गावावरून आदिवासी वाड्यापाड्यावरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी व घरी जाण्यासाठी कित्येक किमीची खडतर पायपीट करावी लागत आहे. यामुळे श्रम व वेळ वाया जात आहे. त्यामुळे लवकर योग्य तोडगा निघून लाल व निळी परी पूर्वव्रत सुरू करावी अशी मागणी अनेक शिक्षक, विद्यार्थी व पालक करत आहेत. यावेळी बोलताना प्रिया किरण डाकी या विद्यार्थीने सांगितले की मुंबई गोवा महामार्गावर सतत वाहनांची येजा सुरू असते, उन्हातान्हात पायी चालत जाताना येताना खूप त्रास होतो, वाहनांची खूप भीती वाटते, एस टी बस लवकर सुरू व्हावी हीच मागणी असल्याचे प्रिया ने सांगितले.

तसेच तब्बल दोन ते तीन किलोमीटर चा पायी प्रवास करून आलेल्या करिष्मा नागोठकर या विद्यार्थीनीने देखील आपली व्यथा मांडली. कोव्हिडं च्या वातावरणानंतर आम्हाला शाळेत यायला खूप हुरूप आला होता, मात्र शाळा सुरू व एस टी बंद अशी परिस्थिती झाली. तळपत्या उन्हात पायी चालत येताना खूप हाल होतात, गाड्या जवळून जाताना हादरे बसतात, खूप भीती वाटते. लवकरच एसटी सुरू व्हाव्यात.

## चिमुकली शनया काळेने दोनशे फूट उंचीचा हरिहर किल्ला केला सर

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रायगड जिल्ह्यातील जिते - कुंबळमाच येथील सुपुत्री व सध्या गोरेगाव मुंबई येथे राहत असलेली ५ वर्ष वयाची चिमुकली शनया काळे या मुलीने बालदिनाच्या दिवशी १४ नोव्हेबर २०२१ रोजी भारतातील सर्वात लोकप्रिय आणि थरारक ट्रेक किल्ला म्हणून प्रसिद्ध असलेला नाशिक जिल्ह्यातील हरिहर हा किल्ला सर करून बालपणीच ट्रेकिंग क्षेत्रात नावलौकिक मिळविला आहे.



२०० फुट उंची वरील, तीव्र आणि सरळ चढाव असलेला आणि जवळपास कातळात कोरलेल्या ११७ पायऱ्या असलेला हा किल्ला कु. शनया हिने लीलया सर केला. या बाबत कु. शनयाचे सर्व थरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे. शनया हिला तीचे मामा साऊ सफर ट्रेकिंग ग्रुपचे संचालक सुरेश पोळेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. शनयाला हिला बाल वयापासूनच गडकिल्यांबद्दल आकर्षण असून तीने आतापर्यंत २ वेळा रायगड किल्ला पायी सर केला आहे. यासोबतच शनयाने लहान मोठे ट्रेक सुद्धा केले आहेत.

बालदिनाच्या दिवशी हरिहर किल्ला सर करण्यासाठी आधीपासूनच शनयाची तयारी करण्यात आली होती. तसेच सुरक्षतेच्या दृष्टीने हेल्मेट, ऐल्बो आणि लेग गार्ड, रोप, मेडिसिन या सगळ्या वस्तूंची तयारी शनयाचे मामा सुरेश पोळेकर यांनी केली होती. दरम्यान साऊ सफर ट्रेकिंग ग्रुपच्या माध्यामातून गरजवंत लोकांना मदतीचा हातभार लावला जात असतो. बालदिनाच्या दिवशी हरिहर किल्ला जवळील निरगुडपाडा या गावात जाऊन साऊ सफर ट्रेकिंग ग्रुपच्या माध्यमातून तेथील मुलांना शैक्षणिक साहित्य, कपडे, खाऊ व अन्य काही वस्तूंचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती सुरेश पोळेकर यांनी दिली.

## माथेरान शिवसैनिकांकडून बाळासाहेब ठाकरेंना अभिवादन



**दै.रायगड नगरी । माथेरान**

१७ नोव्हेंबर शिवसेना प्रमुख, हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या ९ व्या स्मृतिदिना निमित्त माथेरान शिवसेना जनसंपर्क कार्यालयात शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी तसेच नागरिकांनी अभिवादन केले. तर शिवसेनेचे संपर्क प्रमुख प्रसाद सावंत यांनी मुंबईत जाऊन बाळासाहेब ठाकरे यांच्या समाधीस्थळ येथे अभिवादन केले.अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आणि आवाज उठविण्यासाठी तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी शक्ती द्यावी हाच आशीर्वाद सदैव पाठीशी राहो अशी त्यांनी यावेळी समाधी स्थळावर प्रार्थना केली. यावेळी उप शहर प्रमुख सागर पाटील, जेष्ठ शिवसैनिक अरविंद रांजणे, अजमुद्दीन नालबंद, बाळू दाभेकर, रोहित साबळे, सतीश साबळे यांसह अन्य शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते

## सुकलेल्या झाडांच्या फांद्यांची छाटणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रभागातील समस्यांचे निरसन करण्यास नगरसेवक विक्रांत पाटील नेहमीच तत्पर असतात. स्वतः जातीने हजर राहून नागरिकांच्या समस्या कशा प्रकारे सोडवता येतील याकडे यांचा जास्त कल असतो. सुकलेले पाम चे झाडं आणि विद्युत वहिनीवर वाढलेल्या झाडांच्या फांद्या तोडून घेतल्या व त्वरित कापलेलं झाड आणि फांद्या उचलून घेण्यास सांगितले.

## दिपक पाटील यांचा केला जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांनी विशेष सत्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय खारघर येथे शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या हस्ते, दिपक तानाजी पाटील यांना मुंबई विद्यापीठाने पी.एच.डी पदवी प्रदान केली. त्या निमित्ताने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

त्याप्रसंगी उद्योजक रामकृष्णशेठ घरत, डी.वाय.पाटीलचे मुख्याध्यापक गणेश पडवळ, डॉ. जान्हवी रामकृष्ण घरत, कोमल घरत, येरला मेडिकलचे सहकार्य वाहक बाबुराव पोळ तसेच भारती विद्यापीठ कर्मचारी, येरला मेडिकल कर्मचारी, सरस्वती कॉलेजचे कर्मचारी, प्राध्यापक, शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन प्रभाकर महाडीक, सुभाष सूर्यवंशी यांनी केले. या प्रसंगी सर्व मान्यवरांनी शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांना पुढील येणाऱ्या, विधानसभेसाठी आपण उमेदवारी घ्यावी, आम्ही सर्वजन आपल्या पाठीशी ठामपणे उभे राहू असे वचन दिले.




### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.शैलेंद्र श्रीधर गोखले, सौ.मानसी मनोहर गाडगीळ, मुकूंद सिताराम गोखले, दिपक नारायण गोखले, प्रसाद नारायण गोखले यांची मौजे : महोदर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली नमूद केलेल्या शेत मिळकत असून सदरहू मिळकतमधील आदमासे १५८ गुंठे क्षेत्रावर मालकी हक्क, हितसंबंध व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीत आहे. सदर शेत जमीन मिळकतीच्या ७/१२ सदरी आमचे अशिलांच्या नावाची नोंद आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : महोदर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|
| मौजे महोदर, तालुका पनवेल, जिल्हा : रायगड | २०९/१ | २.२०.०० पो.ख.0.६0.00 |

आमचे अशिलांनी सदर मिळकतीमधील त्यांचा वर नमूद क्षेत्रावरील मालकी हक्क कुणासही विकण्याबाबत करार करण्याचा मानस नाही. सदरहू मिळकतीमधील आमचे अशिलांचे मालकी हक्काचे क्षेत्राबाबत विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा करार केला असल्यास सदर करार आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही. सदरहू शेतजमीन मिळकतीबाबत कोणीही प्रस्तावित खरेदीदार खरेदी व्यवहार करीत असल्यास आमचे अशिलांचे हिश्श्याचे क्षेत्र अबाधित ठेवून करार कार्यान्वित करावा, हे सर्वांस कळावे.

पनवेल
दिनांक : १९/११/२०२१

सही/-
ॲड. केदार नि. सोमण
पत्ता : सोमण असो., सोमण बिल्डींग, म.फुले रोड, जनकल्याण बँक, पनवेल-४१०२०६



### जाहीर नोटीस

तमाम जनतेने या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिलांने कायम खरेदीखत / करारनामा करून प्रस्ताविक जमीन मालक श्री.मदन कान्हा म्हात्रे या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिपळे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| पोयंजे | ९/३ | 0-१५-00 | २.४४ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.१८/११/२०२१

सही/-
ॲड.श्री.महेंद्र अनंता पाटील
पत्ता : डी/३/१, किनारा हौ. सोसायटी, बावन बंगलो, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
मो.नं.८८९८०४४६७८



भासारकर साहेब
वकील : ए. के. साहू

### जाहीर नोटीस

वाशी येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
ओ.एम.ए.क्र.७९८/२०२१
ने.ता.२४/१२/२०२१

अंजु अमित अग्रवाल
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.१२०५, शुभ होम सीएचएस, प्लॉट नं.७८,
सेक्टर २०, खारघर, नवी मुंबई-४१०२१० अर्जदार
विरुद्ध
नवी मुंबई महानगरपालिका
आरोग्य खाते (जन्म मृत्यू विभाग)
बी-वार्ड, नेरुळ, नवी मुंबई, ता. व जि.ठाणे सामनेवाले

वरील अर्जदार यांचा सासरा कै.जैदेव प्रसाद अगरवाल यांचा मृत्यू दि.२५/०७/२००५ रोजी दुपारी १.१५ वाजता श्रुश्रुषा हार्ट केअर सेंटर ॲण्ड स्पेशालिटी हॉस्पिटल, नेरुळ, नवी मुंबई येथे झालेला आहे. सदर मयताचे मृत्यूची नोंद त्यावेळी नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य खाते (जन्म-मृत्यू विभाग) बी-वार्ड, नेरुळ, नवी मुंबई, ता. व जि.ठाणे यांच्या कार्यालयात झालेली नसल्याने अर्जदाराने मयताचे मृत्यू दाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे, असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मृत्यूदाखल्याबाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने लेखी हरकत ही जाहीर नोटीस ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मृत्यू दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

दि.१८/११/२०२१

सही/- क.लिपीक फौ.न्याया, वाशी | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, वाशी



वकील : श्री.व्ही.ए.मॅथ्यु

### जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल, यांचे न्यायालयात
चौ.अर्ज क्र.११४१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/१२/२०२१

श्रीमती.अनिथा के.के.
वय : ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
कु.स्थाव्या सुरेश
वय : १० वर्षे, व्यवसाय : विद्यार्थी
दोघी रा.फ्लॅट नं.५१०, फिनिक्स नेस्ट,
५ वा मजला, प्लॉट नं.१६, सेक्टर १७,
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

वरील अर्जदारचे पती / वडील कै.सुरेश कृष्णन यांचे दि.२०/०५/२०२१ रोजी मुंबई येथे निधन झाले. मयत कै.सुरेश कृष्णन नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**SCHEDULE HEREIN ABOVE REFERRED**
**Schedule of Property :-**
**Flat No.501, Phoenix Nest, 5 th Floor,**
**Plot No.16, Sector-17, Kalamboli,**
**Tal-Panvel, Dist-Raigad-410218**
**(Area of Property-25.645 Square Mts) and**
**Valuation Rs.32,00,000/- (Rs.Thirty Two Lakhs Only)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांना दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणतीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/११/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



राव साहेब
अर्जदारातर्फे वकील : ॲड.दिपक म. ठाकूर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.६४३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०१/१२/२०२१

१) अमन सिंग सिन्हा
वय २७ वर्षे, व्यवसाय : ट्रान्सपोर्ट
रा.साई पुजा अपार्टमेंट, रुम नं.१, प्लॉट नं.३,
सेक्टर ११, न्यू पनवेल, पनवेल-४१०२०६
२) दर्शन सिंग सिन्हा
वय : ५८ वर्षे, व्यवसाय : ट्रान्सपोर्ट
रा.साई पुजा अपार्टमेंट, रुम नं.१, प्लॉट नं.३,
सेक्टर ११, न्यू पनवेल, पनवेल-४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार क्र.१ यांची आई व अर्जदार क्र.२ यांची पत्नी म्हणजेच जगजीत कौर सिन्हा ही १३/०१/२०२१ रोजी मयत झालेली आहे. तिचा मृत्यूसबंधीचा पुरावा म्हणून तिचा मृत्यूचा दाखला येथे जोडलेला आहे.

सदर मयताचे मृत्यूपश्चात वरील अर्जदारांची वारसनोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. जगजीत कौर सिन्हा ह्या मयत झाले असून, तिच्या मृत्यूसमयी तिच्या नावाची नोंद असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**१) मिळकतीचे वर्णन**
**सदनिका**

| अ.क्र. | सदनिकेचे वर्णन | क्षेत्रफळ चौ.फूट | किंमत |
|---|---|---|---|
| १ | रुम नं.१, प्लॉट नं.३, सेक्टर ११ साई पुजा अपार्टमेंट, न्यू पनवेल, पनवेल ४१०२०६ | ७०० | २,८०,०००/- (दोन लाख, ऐंशी हजार फक्त) |

**१) मिळकतीचे वर्णन**
**गाळा**

| अ.क्र. | सदनिकेचे वर्णन | क्षेत्रफळ चौ.फूट | किंमत |
|---|---|---|---|
| २ | गाळा नं.१, प्लॉट नं.२६, सेक्टर ११, हजरी कॉर्नर अपार्टमेंट, न्यू पनवेल, पनवेल-४१०२०६ | २३७ | ३,११,०००/- (तीन लाख, अकरा हजार फक्त) |

येणेप्रमाणे गाळा आहे, परंतु ते हयात नाहीत. त्यांचे वारस म्हणून वरील अर्जदार यांनी सदरहू सदनिका व गाळा मिळावा म्हणून या न्यायालयात वारस दाखला केला आहे. सदरहू अर्जदारांना वारस दाखला देणे विषयी कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत कोर्टात दाखल करावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दि.१५/११/२०२१ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



राव साहेब
अर्जदारातर्फे वकील : ॲड.दिपक म. ठाकूर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.९३९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०१/१२/२०२१

१) श्रीमती.रुपाली संजय कोळी
वय वर्षे ४६, व्यवसाय : गृहिणाी
सध्या रा.रुम नं.३१२, गुलफान अपार्टमेंट को.ऑप., हौ.सोसायटी लि., उरण पनवेल रोड, लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट जवळ, पनवेल, जि.रायगड-४१०२०६
२) श्रीमती.जयश्री मदन कोळी
वय वर्षे ६९, व्यवसाय : गृहिणी
सध्या रा.रुम नं.३०९, गुलफान अपार्टमेंट को.ऑप., हौ.सोसायटी लि., उरण पनवेल रोड, लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट जवळ, पनवेल, जि.रायगड-४१०२०६
३) कुमारी वंशिक संजय कोळी
वय वर्षे २२, व्यवसाय : शिक्षण
सध्या रा.रुम नं.३०९, गुलफान अपार्टमेंट को.ऑप., हौ.सोसायटी लि., उरण पनवेल रोड, लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट जवळ, पनवेल, जि.रायगड-४१०२०६
४) कुमार आकर्षित संजय कोळ
वय वर्षे २०, व्यवसाय : शिक्षण
रुम नं.३०९, गुलफान अपार्टमेंट को.ऑप., हौ.सोसायटी लि., उरण पनवेल रोड, लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट जवळ, पनवेल, जि.रायगड-४१०२०६
५) कुमार आविष्कार संजय कोळी
वय वर्षे १५, व्यवसाय : शिक्षण
अर्जदार नं.५ करिता पालनकर्ती रुपाली संजय कोळी
सध्या रा.रुम नं.३१२, गुलफान अपार्टमेंट को.ऑप., हौ.सोसायटी लि., उरण पनवेल रोड, लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट जवळ, पनवेल, जि.रायगड-४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांचे पती कै.संजय मदन कोळी यांचे निधन दि.२७ जानेवारी २०१६ रोजी दिघोडे, ता.उरण येथे राहत्या घरी झाले. त्यासंदर्भात त्यांच्या मृत्यूसंबंधीचा पुरावा म्हणून त्यांचा मृत्यूचा दाखला येथे जोडलेला आहे.

सदर मयताचे मृत्यूपश्चात वरील अर्जदारांची वारसनोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. कै.संजय मदन कोळी हे मयत झाले असून, त्यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावाची नोंद असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**सदनिकेचे / मिळकतीचे वर्णन**

| मिळकत | क्षेत्र | ॲग्रीमेंट व्हॅल्यू रुपये |
|---|---|---|
| रुम नं.३१२, गुलफान अपार्टमेंट को.ऑप., हौ.सोसायटी लि., उरण पनवेल रोड, लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट जवळ, पनवेल, जि.रायगड-४१०२०६ | ६५५.८३ चौ.फिट बिल्टअप | २,५२,४९५.५५/- (अक्षरी किंमत रुपये दोन लाख, बावन्न हजार चारसे चौऱ्याअण्णव रुपये पंच्यावन्न पैसे मात्र) |

येणेप्रमाणे सदनिका आहे, परंतु ते हयात नाहीत. त्यांचे वाारस म्हणून वरील अर्जदार यांनी सदरहू सदनिका मिळावी म्हणून या न्यायालयात वारस दाखल्याचा अर्ज केला आहे. सदरहू अर्जदारांना वारस दाखला देणे विषयी कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत कोर्टात दाखल करावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दि.१५/११/२०२१ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## ड्रोनव्दारे गावठाण सर्व्हेकरिता नागरिकांनी सहकार्य करावे : डॉ.पद्मश्री बैनाडे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

गावठाण भूमापन प्रकल्प योजनेत भारतीय सर्व्हेक्षण विभाग (सर्व्हे ऑफ इंडिया) मार्फत जिल्ह्यात स्वामित्व योजनेंतर्गत ड्रोनव्दारे गावठाणातील मिळकतीचे सर्व्हे करण्यात येणार असून नागरिकांनी ड्रोनव्दारे सर्व्हे साठी येणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात (दि.१६ नोव्हेंबर २०२१) रोजी आयोजित स्वामित्व योजनेंतर्गत ड्रोनव्दारे गावठाणातील मिळकतीचे सर्व्हेबाबतच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा अधीक्षक भूमिलेख अधिकारी सचिन इंगळी तसेच विविध शासकीय विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे म्हणाल्या की, रायगड जिल्ह्यातील एकूण महसूली गावे १ हजार ६९६ व वाडया/पाडे १ हजार १८७ असे एकूण २ हजार ८८२ गावठाणाचे स्वामित्व योजनेंतर्गत ड्रोन व्दारे सर्व्हेक्षण होणार आहे. त्याअनुषगांने भूमी अभिलेख विभाग, ग्रामविकास विभाग व महसूल विभाग, पोलीस विभाग, नगर रचना विभाग यांची संयुक्त बैठक पार पडली आहे. ड्रोनव्दारे गावठाण भूमापन करताना ग्रामस्तरावरील ग्रामसेवक, तलाठी, व भूमापक यांच्या कर्तव्य आणि जबाबदाऱ्या शासनाच्या परिपत्रकात दिल्या असून त्याप्रमाणे प्रत्येकाने आपआपली कामे जबाबदारीने पूर्ण करावीत अशा सूचना उपस्थित संबधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. ड्रोनव्दारे गावठाण भूमापन योजनेवेळी नागरिकांना तसेच ग्रामपंचायतींना होणाऱ्या लाभाबाबत माहिती देण्यात यावी. बैठकीत उपस्थित सर्व सदस्यांना गावठाण भूमापन योजना राबविणे व यशस्वी करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य व जबाबदाऱ्या पार पाडव्यात अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीमध्ये जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख रायगड सचिन इंगळी यांनी ड्रोन सर्व्हेक्षणाव्दारे गावठाण भूमापन करण्यासाठी स्वामित्व योजनेंतर्गत करावयाच्या कार्यवाहीबाबत उपस्थित विभागप्रमुखांना सविस्तर माहिती दिली. तसेच ड्रोनव्दारे गावठाण भूमापन करावयाच्या कार्यपध्दतीचे ध्वनीचित्रफितीव्दारे प्रबोधन करण्यात आले.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# निकृष्ठ दर्जाच्या क्ले पेव्हर ब्लॉकमुळे अपघातांची वाढती संख्या

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये एमएमआरडीए च्या माध्यमातून क्ले पेव्हर ब्लॉकची कामे मोठया प्रमाणावर सुरू असून दस्तुरी येथील काळोखीच्या भागातील अती चढावाच्या ठिकाणी लावण्यात आलेले क्ले पेव्हर ब्लॉक हे केवळ दोन महिन्यांत गुळगुळीत झाल्यामुळे त्यावरून घसरून पडून अपघात होण्याचे प्रमाण वाढत चालले आहे.



सुरुवातीलाच ह्या चढावाच्या जागेचा भाग कमी करावा जेणेकरून वाहतूक व्यवस्था सुरळीत होऊ शकते याबाबत स्थानिकांनी अनेकदा एमएमआरडीए अधिकाऱ्यांना समक्ष जागेवर बोलावून सूचित केले होते. परंतु याकडे कानाडोळा करत ही कामे जलदगतीने पूर्ण करण्यात आली होती. त्यातच जे ब्लॉक या रस्त्याला लावण्यात आलेले आहेत त्यावर मातीचा मुलामा आणि खाली सिमेंट असल्याने वरच्या भागातील मातीचे आवरण निघून जात आहे या मुख्य रहदारीच्या रस्त्यावर जवळपास सर्व मिळून एक हजार घोड्यांची रेलचेल सुरु असते.

पर्यटक तसेच पादचारी आणि हातरीक्षा सुध्दा याच काळोखीच्या मार्गे येत असतात. त्यामुळेच हे ब्लॉक अल्पावधीतच झिजून गेल्याने गुळगुळीत झालेले आहेत.

घोड्यांच्या पायाला लोखंडी नाल असल्याने ते अशा रस्त्यावरून घसरतात आणि अपघात होत आहेत. वैष्णोदेवीच्या ठिकाणी जे घोडे पर्यटकांची वाहतूक करतात त्या भागात घोड्यांच्या पायाला लोखंडी नाला ऐवजी रबराचे आवरण असते त्यामुळे तेथील घोडे घसरून पडत नाहीत.

आगामी काळात माथेरान मधील सर्वच पॉईंट्स कडे जाणारे रस्ते सुद्धा धुळविरहित आणि पावसाळ्यात मातीची धूप होऊ नये यासाठी अशाचप्रकारे क्ले पेव्हर ब्लॉकचे करण्यात येणार आहेत.त्यामुळे घोड्यांच्या सुरक्षेसाठी सुध्दा वैष्णोदेवी येथील घोड्यांप्रमाणे पायाला रबराचे आवरण लावल्यास घोडे घसरून पडण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. तूर्तास ज्या ज्या ठिकाणी निकृष्ठ दर्जाचे ब्लॉक बसविण्यात आलेले आहेत त्याजागी उत्तम दर्जाचे शासनाच्या सुयोग्य परीक्षणातील ब्लॉक मागविण्यात यावेत अशी मागणी सुध्दा जोर धरू लागली आहे.

## धार्मिक भावना भडकाविणाऱ्या आक्षेपार्ह पोस्ट, व्हिडिओ व्हायरल करु नका ; पोलिसांचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

त्रिपुरा येथे मशिदीवर हल्ला झाल्याची घटना घडल्यानंतर त्याचे पडसाद संपूर्ण देशासह राज्यात उमटू लागले आहेत. काही व्यक्ती धार्मिक भावना भडकाविणाऱ्या आक्षेपार्ह पोस्ट, खोट्या बातम्या प्रसारित करणारे ऑडिओ, व्हिडिओ आणि संदेश सोशल मिडीयावरुन व्हायरल करीत असल्यामुळे राज्यातील काही भागात अप्रिय घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांनी धार्मिक भावना भडकवणारे आणि खोट्या बातम्या प्रसारित करणारे व्हिडिओ किंवा पोस्ट प्रसारित न करण्याच्या सूचना नवी मुंबई पोलिसांकडून करण्यात आल्या आहेत. तसेच अशा प्रकारच्या आक्षेपार्ह व्हिडिओ अथवा पोस्ट करताना कुणी आढळून आल्यास त्याची माहिती जवळच्या पोलीस ठाण्यात देण्यात यावी, असे आवाहन देखील पोलिसांकडून करण्यात आले आहे.

सामाजिक शांतता भंग करणारे समाजविघातक व्हिडिओ, पोस्ट अथवा संदेश सोशल मिडीयावर व्हायरल करणे कायद्याने गुन्हा आहे. अशा प्रकारच्या पोस्ट, व्हिडिओ वर लक्ष ठेवण्याबाबत फेसबूक, इंस्टाग्राम, ट्विटर, व्हॉटस्‌अॅप या सोशल माध्यमांना पोलिसांकडून कळविण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांनी सोशल मिडीया आणि इंटरनेटच्या माध्यमातून पोस्ट करताना सामाजिक भान ठेवत माहिती-तंत्रज्ञान अधिनियम २०००, (आयटी अॅक्ट २०००) मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.

त्याचप्रमाणे व्हॉटस्‌अॅप वापरणारे, ग्रुप मध्ये असणारे सर्व सदस्य विशेषत: ग्रुप अॅडमिनने आपल्या ग्रुपमध्ये अशा प्रकारचे पोस्ट किंवा व्हिडिओ प्रसारित होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याच्या सूचना पोलिसांकडून करण्यात आल्या आहेत.

तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. धार्मिक भावना भडकविणारे आणि खोट्या बातम्या प्रसारित करणारे व्हिडिओ किंवा पोस्ट प्रसारित करु नये. तसेच अशा प्रकारची आक्षेपार्ह व्हिडिओ पोस्ट करताना कुणीही आढळून आल्यास त्याची माहिती त्वरित नजिकच्या पोलीस ठाण्यात देण्यात यावी, असे आवाहन नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलकडून करण्यात आले आहे.

## दिघोडे - जांभूळपाडा महामार्गावर भर पावसात प्रचंड वाहतूक कोंडी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर - गव्हाणफाटा महामार्गावरील दिघोडे - जांभूळपाडा महामार्गावर नियमित होत असलेल्या अवजड कंटेनर ट्रेलरच्या वाहतूकीमुळे वाहनचालक आणि पादचारी अक्षरशः हैराण झाले आहेत. त्यातच दोन दिवस सायंकाळच्या सुमारास होणाऱ्या अवकाळी पावसातही या महामार्गावर प्रचंड प्रमाणात अवजड कंटेनर ट्रेलरची वाहतूक कोंडी निर्माण झाल्याने वाहतूक २ तास ठप्प झाली होती.



या महामार्गावर दिघोडे - गव्हाणफाटा दरम्यान असलेले कंटेनर गोदामातील अवजड वाहतुकीची वर्दळ अधिक प्रमाणात असून,या गोदामांना ट्रेलर पार्किंगच्या ठिकाणी बेसुमारपणे कंटेनर उभे करण्यात येत आहेत.त्यामुळे या गोदामांना अन्य कोणत्याही ठिकाणी पार्किंगची व्यवस्था नसल्याने महामार्गाच्या दोन्ही बाजूला अवजड कंटेनर ट्रेलर पार्किंग करण्यात येत आहेत.त्यातच या रस्त्यावर २४ तास वाहनांची सुरू असलेली वर्दळ यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न नित्याचा ठरत आहे.

# माथेरानचे अधीक्षक कार्यालय सुरू न केल्यास सागर पाटील यांचा उपोषणाचा इशारा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मागील अनेक दिवसांपासून येथील अधिक्षक कार्यालय बंद असल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे याकामी लवकरच हे कार्यालय सुरू करावे अन्यथा दि. २२ नोव्हेंबर पासून अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल असा सज्जड इशारा शिवसेनेचे कार्यशील उप शहर प्रमुख सागर पाटील यांनी रायगड जिल्हाधिकारी यांना दि.१२ नोव्हेंबर रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

माथेरानची नगरपरिषद स्थापन होण्यापूर्वी अर्थातच सन १८६६ मध्ये अधीक्षक कार्यालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. इथल्या नागरिकांची शासकीय कामे वेळेत आणि लवकरात लवकर पूर्ण व्हावीत हा यामागचा उद्देश होता. त्यामुळे नागरिकांची सर्व प्रकारची शासकीय कामे पूर्ण होत असल्याने समाधान व्यक्त केले जात होते.

परंतु सध्या या कार्यालयाला कुणीही शासकीय अधिकारी वारस नसल्याचे दिसून येत आहे.जेष्ठ नागरिकांना नागरिक दाखला, शालेय विद्यार्थ्यांना उत्पन्नाचे दाखले, वय अधिवास दाखले, रेशनकार्ड विषयक बाबी, इमारतींच्या लीज नूतनीकरण करणे, गॅस पुरवठा बाबतीत असलेल्या नागरिकांच्या समस्या याबाबत सध्या कर्जत तहसील कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत आहेत.

ही खूपच खर्चिक आणि कष्टदायक बाब असल्याने जेष्ठांचे यामध्ये खुप हाल होत आहेत. इथल्या नागरिकांच्या या महत्वपूर्ण समस्येवर लवकरच तोडगा निघाला नाही तर दि. २२ नोव्हेंबर पासून अधीक्षक कार्यालयासमोर सकाळी अकरा वाजलेपासून आपल्या समस्त कार्यकर्त्यां समवेत बेमुदत उपोषण करण्यात येईल असा सज्जड इशारा शिवसेनेचे कार्यशील उप शहर प्रमुख सागर पाटील यांनी रायगड जिल्हाधिकारी यांना दि.१२ नोव्हेंबर रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# आझाद हिंद शेतकरी संघटनेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

### एस.टी.च्या विलिनीकरणाला पाठींब्याचे पत्र

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे खासगीकरण रद्द करून सरकारी विलीनीकरण करण्यासाठी आझाद हिंद शेतकरी संघटनेने पाठिंबा दर्शविला असून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.उध्दव ठाकरे यांना एस.टी.च्या विलिनीकरणाला पाठिंब्याचे पत्र महाड तहसिलदार सुरेश काशिद यांच्यामार्फत पाठविण्यात आले आहे. यानंतर महाड एस.टी.आगारातील आंदोलनकर्त्या एस.टी.कर्मचाऱ्यांना आझाद हिंद शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी भेटून पाठिंबा दर्शविला.



आझाद हिंद शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अॅड.सतीशचंद्र रोठे पाटील व कोकण प्रदेश अध्यक्ष काळूराम आर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा महिला अध्यक्षा अस्मिता भूषण देवळेकर, जिल्हा उपाध्यक्ष प्रभाकर झांजे, महाड पोलादपूर तालुका अध्यक्ष संजय आंबावले, महाड तालुका अध्यक्ष बापू डोंबे, महाड तालुका कामगार अध्यक्ष संतोष चव्हाण, महाड तालुका उपाध्यक्ष विजय चाळके, उज्वला गायकवाड, हरिश्चंद्र उंदरे, बाळकृष्ण वाडकर, रामचंद्र मोरे, संदीप कदम, बबन बटावले, विद्याधर हेले, एकनाथ सुतार, दत्ताराम मोरे आदींनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे खासगीकरण रद्द करून सरकारी विलीनीकरण करण्यासंदर्भातील आंदोलनाला पाठिंबा असल्याचे पत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.उध्दव ठाकरे यांना महाड तहसिलदार सुरेश काशिद यांच्यामार्फत पाठविण्यासाठी दिले. यानंतर महाड येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सुरू असलेल्या आंदोलनस्थळी जाऊन आझाद हिंद शेतकरी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आंदोलनाला आझाद हिंद शेतकरी संघटनेचा पाठिंबा असल्याचे निवेदन देऊन पाठिंबा दर्शविला.

# कर्जत तालुक्यात स्थानिक शिवसैनिकांना कंटाळून राष्ट्रवादीत प्रवेश

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील बीड ग्रामपंचायत मधील शिवसैनिकांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या एकाधिकार शाहीला कंटाळून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. स्थानिक ग्रामपंचायत मधील विकास कामे रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष यांच्या माध्यमातून सुरु असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस च्या माध्यमातून विकास सुरु आहे आणि म्हणून विकास करणार्या पक्षाच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय स्थानिक शिवसैनिक यांनी घेतला. रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या उपस्थितीत त्या सर्व कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.



कर्जत तालुक्यातील प्रतिष्टीत समजली जाणारी बीड ग्रामपंचायत मधील मौजे बीड ग्रामपंचायत परिसरात रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या माध्यमातून रस्ते, नळपाणी योजना, समाजमंदिर, शाळा, आंगणवाडी अशी अनेक प्रलंबित कामे पूर्ण झाली आहेत. मात्र तालुक्यातील शिवसेना पक्षाकडून येथील तरुणांना गावाच्या विकासकामांसाठी आश्वासन वारंवार देण्यात आली.

जेव्हा जेव्हा येथील युवकांना गावाच्या विकासासाठी किंवा अन्य कामांसाठी मदत लागली त्यावेळी तालुक्यातील किव्हा विभागातील पक्षाच्या नेत्यांकडून कोणतीही मदत करण्यात आली नाही. त्यामुळे शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकारी यांच्या भूलथापांना कंटाळून बीड गावातील शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाण्याचा निर्णय घेतला. माजी शाखाप्रमुख आणि ग्रामपंचायतचे माजी सदस्य संतोष पवार,स्थानिक शिवसैनिक मंगेश रुठे, रोशन रुठे, दत्ता रुठे,या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

# ‘नो एन्ट्री’त घुसणाऱ्या वाहन चालकांवर पोलिसांची धडक कारवाई

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली शहरात दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत आहे. तसेच हजरत गाजी बाबांच्या दर्ग्यापासून ते शिळफाटा येथील इंदिरा गांधी चौकापर्यंत रस्ता रुंदीकरण न झाल्याने अरुंद रस्ता असल्याने परिसरात दररोज वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडी होत असल्याने वाहनचालक पर्यायी मार्ग शोधत ’नो एन्ट्री’तून प्रवेश करीत असल्याने अपघातांना आमंत्रण मिळत असल्याने पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी ’नो एन्ट्री’त शिरणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.



खोपोलीकडून लौजी, चिंचवली, हाळ, खालापूर, पनवेल व मुंबईकडे जाणारे वाहनचालक वाहतूक कोडींला वैतागून इंदिरा गांधी चौकातून महामार्गाला न लागता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पाताळगंगा नदीवरील छोट्या पुलावरून ’नो एन्ट्री’ मार्गातून बिनधास्त वाहने घुसवित असल्याने पुलानंतर लौजीकडे जाणाऱ्या रस्त्यांवर वाहतूक पोलिसांची टीम उभी राहून ’नो एन्ट्री’त शिरणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करीत आहेत. याबाबत अधिक माहिती घेतली असता वाहतूक पोलिसांनी पत्रकारांना माहिती देताना सांगितले की, पहिल्या दिवशी १३५, दुसऱ्या दिवशी १२७, तिसऱ्या दिवशी ७० वाहनांवर करावी करण्यात आली.

रस्ता रुंदीकरणाला मुहूर्त मिळेना :- जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गाच्या रस्ता रूंदीकरणाचे काम सुरू आहे. हजरत गाजी बाबा दर्ग्यांपासून ते वरची खोपोलीपर्यंत रूंदीकरणाचे काम झाले आहे. परंतु गाजी बाबा दर्ग्यांपासून ते शिळफाटा इंदिरा गांधी चौकापर्यंतच्या रस्ता रूंदीकरणाला अद्याप मुहूर्त मिळत नसल्याने या ठिकाणी सकाळी व संध्याकाळी वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे.

त्यातच एसटी बस स्टैंडमध्ये जाण्यास पर्यायी मार्ग नसल्याने बस स्टैंडमध्ये शिरणाऱ्या बसमुळे देखील वाहन कोडींत भरच पडत असते. त्याचप्रमाणे रस्त्यांवर उभ्या केलेल्या वाहनांचाही त्रास वाहनधारकांना होत असतो.

खोपोली शिळफाटा येथून लौजी, चिंचवली किंवा हाळ गावाकडे जाणारे वाहनचालक इंदिरा गांधी चौकापर्यंत न जाता छत्रपती शिवाजी महाराज चौकातूनच छोट्या पुलावरून जात असतात. सध्या पोलिसांकडून त्या विरोधात जोरदार मोहिम उघडण्यात आली आहे. पोलिस प्रशासन आपली जबाबदारी पार पाडत असले तरी त्या मार्गांवर शिरत असताना ’नो एंट्री’ अथवा ’वन वे’ किंवा चौकातून उजवीकडे वळू नका, अशा सूचना देणारे फलक (बॅनर) नसल्यानेही कधी कधी वाहनचालक ’नो एंट्री’त शिरत असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त करतानाच सूचना फलक लावण्याची मागणी करण्यात आली आहे.

# पनवेलमध्ये ज्येष्ठ नागरिक व महिला असुरक्षित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात चेन स्नॅचिंगच्या घटनांमध्ये वाढ झाली असून त्यात ज्येष्ठ नागरिक व महिलांना टार्गेट केले जात असल्याने त्यांच्यामध्ये भितीयुक्त वातावरण आहे.

शहरातील जुन्या पोस्ट ऑफिस जवळच्या जनार्दन सहनिवास सोसायटीत राहणाऱ्या हेमावती कुमारन (७५) या आपल्या सोसायटीच्या आवारात नेहमीप्रमाणे वॉकींग करून नेहमीप्रमाणे बिल्डींगची पायरी चढून आपल्या घरी जात असताना त्यांच्या पाठीमागून आलेल्या एका लुटारुने त्यांच्या गळ्यातील ३० ग्रॅम सोन्याची चेन खेचून तो पसार झाला आहे. ही घटना ताजी असतानाच ६५ वर्षीय प्रमिला लोंढे या मॉर्निंग वॉक करीत असताना बल्लाळेश्वर तलाव परिसरात मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची गंठण खेचून ते पसार झाले आहेत. अशा प्रकारच्या वाढत्या गुन्हेगारीमुळे पनवेलमधील ज्येष्ठ नागरिक व महिलांमध्ये भितीयुक्त वातावरण आहे.